# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 25/10/2019 (शुक्रवार)

---

## चोरी

पो.स्टे. रामटेक :— अंतर्गत 4 कि. मी. अंतरावर मौजा भोंदवाडा येथे दिनांक 23/10/2019 चे 23:30 वा. ते दिनांक 24/10/2019 चे 05:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे— हेमराज उपासराव सायरे, वय 40 वर्ष, रा. भोदेंवाडा यांचा एमएच—40/एएम—604 क्रमांकाचा ट्रॅक्टर व ट्राली कि. 70,000/—रु. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार रावते हे करीत आहे.

## गैरकायदयाची मंडळी

पो.स्टे. सावनेर :— अंतर्गत 10 कि.मी अंतरावर मौजा पानउबाळी येथे दिनांक 24/10/2019 चे 20.30 वा ते 21.00 वा. दरम्यान आरोपी क्र. 1) समीर रामकृष्ण निकोस, रा. सोनोली हा गावात स्पिड मध्ये मोटारसायकल चालवित असतांना फिर्यादी नामे— राहुल सुरेश धुंदे, वय 29 वर्ष, रा. पानउबाळी, ता. कळमेश्वर यांनी गाडी खुप स्पिड मध्ये चालवू नको, असे हटकल्याच्या कारणावरून आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ करुन तुला दाखवितो असे म्हणुन निघुन गेला. यानंतर आरोपीने त्याचे सोबत इतर 5 जणांना आणुन गैरकायदयांची मंडळी गोळा करून हातात तलवार घेवुन आला व फिर्यादीचे दारासमोर जोराने ओरडून शिवीगाळ करुन मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीतांविरुध्द कलम 141,143,147,148,149,504,506 भादंवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सूरू असून गुन्हयाचा पुढील तपास सफौ ईस्माईल शेख हे करीत आहे.

## विनयभंग

पो.स्टे. कळमेश्वर :– दि. 23/10/2019 चे 12:25 वा. दरम्यान 20 वर्षीय पिडीत/फिर्यादी ही घरी एकटी हजर असतांना आरोपी नामे– बालकिसनलाल प्रसाद पटेल, रा. टेकापारनर सिगपुर (मध्यप्रदेश) याने तिच्या घरी अनाधिकृतपणे प्रवेश करून पिडीतेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 354(ड), 448 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि गवई हे करीत आहे.

## फसवणुक

पो.स्टे. कुही :– अंतर्गत 15 कि.मी. अंतरावर वग येथे दिनांक 20/10/2019 चे 16.00 वा. ते दिनांक 22/10/2019 चे 19.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– प्रभाकर भाऊराव जिभकाटे, वय 45 वर्ष, रा. वग यांना अज्ञात आरोपीने मोबाईलने फोन करून सांगितले की, 'बॅकेतुन मॅनेजर आहे, तुमचे पासबुक व एटीएम बंद झाले आहे. ते पुन्हा युरू करण्यासाठी एटीएम क्र. व ओटीपी क्र. सांगा'' असे म्हटले. यामुळे फिर्यादीने आरोपीच्या सांगण्यावरून एटीएम नंबर व ओटीपी बाबतची माहिती दिली. यानंतर आरोपीने या माहितीच्या आधारावर ऑनलाईन पद्धतीने फिर्यादींच्या खात्यातून 61,971/–रू. काढुन घेत फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे आरोपी विरुध्द कलम 420 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री. राऊत हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर